# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ / फाल्गुन २६, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री,** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

### नागपूर शहरातील मोतीबाग येथील ड्रग्स तस्करांच्या घरी छापा टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त केल्याबाबत

**(१) * २४६१४ श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात गुन्हे शाखेच्या युनिटने ऑपरेशन थंडरच्या माध्यमातून मोतीबाग परिसरातील कुख्यात ड्रग्स तस्करांच्या घरी छापा टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील अनधिकृत झोपडपट्टयांमधून सदर ड्रग्स तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर तस्करी थांबविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेवून संबंधितांविरुद्ध मोक्का अंतर्गत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत पाचपावली पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, युनिट-५ च्या पथकाने दिनांक १६.१२.२०२५ रोजी ऑपरेशन थंडर या विशेष मोहिमेच्या माध्यमातून भिमरत्न नगर झोपडपट्टी, नोगा कंपनी जवळ, राय आशयानाच्या मागे, पाचपावली नागपूर शहर या ठिकाणी छापा टाकून एका आरोपीच्या ताब्यातून १० किलो १२० ग्रॅम गांजा, अग्नीशस्त्र साठा व इतर साहित्य असा एकूण रू.५,५१,७००/- इतक्या किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने, पाचपावली पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे अप.क्र.१०२२/२०२५ अन्वये, एनडीपीएस कायदा, १९८५ चे कलम ८(क), २०(ब) (ii),२९, सह भारतीय हत्यार कायदा, १९५९ कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ५ आरोपी निष्पन्न असून त्यापैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी अटक पूर्व जामिनावर असून एका पाहिजे आरोपीचा शोध सुरू आहे.

तसेच, सदर गुन्ह्यांच्या तपासा दरम्यान दिनांक ०४.०२.२०२६ रोजी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ मधील कलम ३(१) (ii), ३(२), ३(४) अन्वये सदर गुन्ह्यातील आरोपींवर गुन्हा दाखल करून कलमवाढ करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाच्या शिफारशी वेळेत**
**अंमलात आणण्यासाठी यंत्रणा उभारणेबाबत**

**(२) * २९०४८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने सन २०१३ ते २०२५ या कालावधीत दिलेल्या १८० शिफारशींपैकी केवळ ४४ शिफारशींवर शासनाने कार्यवाही केली असून उर्वरित १३६ प्रकरणांत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाच्या आदेशानुसार पीडितांना द्यावयाची सुमारे रूपये ३.४ कोटी रुपयांची नुकसान भरपाई अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने या विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून राज्य शासनाला रुपये ३.४ कोटी जमा करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या १० वर्षांपासून उक्त शिफारशी प्रलंबित राहण्यामागील कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मानवाधिकार आयोगाच्या शिफारशी वेळेत अंमलात आणण्यासाठी ठोस यंत्रणा उभारणे, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व भविष्यात अशी परिस्थिती उद्‌भवू नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यांचे कार्यालयाकडून माहिती अधिकारात प्राप्त करून घेतलेल्या माहितीच्या आधारे याचिकाकर्ता यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ११८/२०२५ दाखल केली आहे.

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडून प्रलंबित दाखविण्यात आलेल्या १३६ शिफारशींपैकी ५७ शिफारशींवर शासनाने कार्यवाही केलेली आहे. ३० शिफारशींच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेल्या आहेत. तसेच, ९ शिफारशींच्या अनुषंगाने राज्य मानवी हक्क आयोगात पुनर्विलोकन याचिका दाखल आहेत. २ प्रकरणे ही इतर राज्य सरकार व अन्य संस्थेशी संबंधित आहेत. तसेच, २ प्रकरणातील तक्रारदार यांनी स्वत: नुकसान भरपाईची रक्कम नाकारली आहे. तसेच, उर्वरीत शिफ़ारशींवर शासन स्तरावर सर्व संबंधित विभागांकडून कार्यवाही चालू आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.११८/२०२५ मध्ये दिनांक २७/१/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने रुपये ३.६० कोटी इतकी रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) मानवाधिकार आयोगाच्या शिफारशींची विहीत वेळेत अंमलबजावणी करण्याकरिता ठोस यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या दिनांक ०४.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मानवाधिकार आयोगाच्या शिफ़ारशींच्या अनुषंगाने समन्वय व कार्यवाही करण्याकरिता मंत्रालय स्तरावर एक नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच, प्रत्येक प्रशासकीय विभागास त्यांच्या स्तरावर एक नोडल अधिकारी यांची नेमणूक करून गृह विभागाच्या नोडल अधिकारी यांच्यासोबत समन्वय राखण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, राज्य मानवी हक्क आयोगाने केलेल्या शिफ़ारशींच्या अनुषंगाने विहित मुदतीत कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत, त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर, नाशिक व चंद्रपूर जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(३) * २४५६९ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.करण देवतळे (वरोरा), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई, नालासोपारा व विरार शहरात नायजेरियन लोक बेकायदा वास्तव्य करून अंमली पदार्थांची विक्री करीत असून त्यांच्याकडून तुळींज पोलिसांकडून लाखो रूपये किंमतींचे कोकेन जप्त करण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात नायजेरियन लोकांनी गुमास्ता शिवाय अंमली पदार्थांची विक्री केली असून सदर प्रकरणी अधिकची चौकशी केली असता त्यांचेकडे व्हिसा व पासपोर्ट देखील नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नाशिक जिल्ह्यात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका टोळीला नाशिक-पुणे रस्त्यावरील हॉटेल "नाशिक इन" येथे छापा टाकून त्यांच्याकडून रूपये २ लाख २३ हजार इतक्या मुद्देमालासह अटक करण्यात आली असता, उक्त अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीमध्ये एका पोलीस पुत्राचाही समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच भद्रावती (जि.चंद्रपूर) शहरातील पोलिसांनी नागपूर ते चंद्रपूर मार्गावरून दुचाकीवर गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन ३ किलो ११६ ग्रॅम गांजा जप्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय घटकात नायजेरीयन लोक अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याबाबत सन २०२५ व २०२६ मध्ये एकूण २० गुन्हे दाखल करण्यात आले

आहेत. सदर गुन्ह्यात एकूण २७ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रु.३६,५५,४२,१२०/- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त गुन्ह्यांतील एकूण २७ आरोपींपैकी १३ आरोपींकडे कोणतेही पासपोर्ट व व्हिसा नसल्याबाबत व अवैध्यरित्या वास्तव्य करत असल्याबाबत निदर्शनास आले आहे. सदर आफ्रिकन नागरीकांना डिपोर्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) दिनांक ०९.११.२०२५ रोजी नाशिक इन हॉटेल, विजय ममता टॉकीज जवळ, पुणे-नाशिक रोड या हॉटेलच्या रुम क्र.३०५ मध्ये असलेल्या ३ व्यक्तींपैकी एका व्यक्तीच्या ताब्यात ३२ ग्रॅम वजनाचा रु.१,६०,०००/- किंमतीचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळून आल्याने उपनगर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.क्र.५०५/ २०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २२(ब), २५, २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण रु. २,२३,३८०/- किंमतीचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ज्या आरोपीच्या ताब्यातून एम.डी.(मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जप्त केला हा आरोपी नाशिक ग्रामीण येथून सेवानिवृत्त झालेल्या पोलीसाचा मुलगा आहे.

सदर गुन्ह्यात एकूण ५ आरोपींना अटक करुन त्यांच्या विरुद्ध मा. न्यायालयात दिनांक ०७.०१.२०२६ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे व गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) व (५) दिनांक ०८.०२.२०२६ रोजी मौजे भद्रावती, जामघट हॉटेल समोर नागपूर-चंद्रपूर हायवे रोडवर नाकाबंदी दरम्यान एका दुचाकीवर स्वार असलेल्या २ व्यक्तींच्या ताब्यात गांजा वनस्पतीचे पाने/ फुले/ बियांचे एकूण वजन ३.११६ किलो वजनाचे अंदाचे रु. ६२,३२०/- किंमतीचा अंमली पदार्थ मिळून आला. त्यानुषंगाने सदर दोन्ही व्यक्तींविरुद्ध पोलीस पोलीस स्टेशन, भद्रावती, जि. चंद्रपूर येथे दिनांक ०८.०२.२०२६ रोजी अप.क्र.१९२/२०२६ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २२(ब)(ii), २९ सह मोटार वाहन कायदा कलम १३०,१७७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दिनांक ३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) व पोलीस घटकांमार्फत एकूण रु.५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.१३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे.

अवैध अंमली पदार्थ व्यापारातील संघटीत गुन्हेगारीस आळा घाळण्यासाठी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम,१९९९ मध्ये सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ चे कलम (२) (दोन) अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सदर कायद्या अंतर्गत राज्यात सन २०२५-२०२६ मध्ये एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच परदेशात राहुन त्यांचे हस्तकांमार्फत भारतामध्ये अंमली पदार्थांचे कारखाने चालवून अंमली पदार्थाची निर्मिती व विक्री करणाऱ्या एकूण ०४ आरोपींना प्रत्यार्पण करुन मुंबई पोलीसांनी अटक केली आहे.

त्याचप्रमाणे सन २०२५ मध्ये राज्यात पोलीस व इतर Drug Law Enforcement Agencies यांनी अंमली पदार्थ बनवणाऱ्या छुप्या ठिकाणांवर/कारखान्यांवर कारवाई (Clandestine Lab Bursting) करुन एकूण १४ गुन्हे दाखल केले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर परिसरात एका तोतया नौदल अधिकाऱ्याने नौदलात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(४) * ३०२९९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर परिसरात एका तोतया नौदल अधिकाऱ्याने 'बेस्ट' कर्मचाऱ्याच्या मुलींना नौदलात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून सुमारे २ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोपीने बनावट ओळखपत्रे आणि बनावट नियुक्तीपत्रे (Appointment Letters) दाखवून अनेकांना फसविल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह नोकरी लावण्याच्या नावाने सुशिक्षित बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या अशा टोळ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई घाटकोपर परिसरात राहणाऱ्या फिर्यादी महिलेला आरोपीने तो नेव्ही मध्ये अधिकारी असल्याचे भासवून फिर्यादीचे मुलींना नेव्हीमध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखविले. याकरिता त्याने फिर्यादीकडून रु.२,०१,४०० /- इतकी रक्कम स्विकारली व फिर्यादीस बनावट नियुक्तीपत्र देऊन फसवणूक केली. त्यामुळे सदर प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे,मुंबई येथे दिनांक ३०.०१.२०२६ गु.र.क्र. ६७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३३६ (२) (३), ३३८, ३३९, ३४० (२) (३) (४), ३१८(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीने बनावट ओळखपत्रे व बनावट नियुक्तीपत्रे दाखवून फसवल्याचे आढळून आले आहे.
(३) सदर गुन्हयातील आरोपीचे मोबाईल डिटेल्स व बॅंक डिटेल्सची माहिती प्राप्त करण्यात येत आहे.तसेच साक्षीदारांचा जबाब नोंद करण्यात आला आहे. आरोपीच्या राहत्या पत्त्यावर शोध घेतला असता आरोपी आढळून आला नसून आरोपीला अटक करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सदर आरोपीवर कुलाबा पोलीस ठाणे,मुंबई येथे गुरक्र. ८१/१६ भा.द.वि. कलम १७०, ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४ व माटुंगा पोलीस ठाणे,मुंबई येथे गुरक्र. १९९/१२ भा.द.वि.कलम ४६५, ४६८, ४७१, ४२० अन्वये फसवणुकीचे गुन्हे नोंद असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

अशा प्रकारच्या फसवणुकीच्या गुन्हयांना आळा घालण्याकरीता निर्भया पथकाद्वारे कॉर्नर मिटींग रोज वेगवेगळ्या गर्दीच्या ठिकाणी घेतली जाते. या मिटींगमध्ये नागरिकांना सरकारी नोकरी संदर्भात त्यांच्या संबधित वेबसाईटवर भेट देवून नोकरी बाबत माहिती घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात येते, तसेच नागरिकांना संबधित

ई-मेल आयडीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने सदर ई-मेल, डोमेन हा सरकाराच्या वेबसाईटशी जुळत असल्याची खात्री करावी याबाबत माहिती देण्यात येते. त्याचप्रमाणे सरकारी नोकरी व प्रशिक्षण याकरीता सरकारद्वारे पैशाची मागणी करण्यात येत नाही याबाबत जनजागृत्ती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सौर ऊर्जेचा लाभ कमी केल्यामुळे ग्राहकांच्या वीज देयकात वाढ झाल्याबाबत**

**(५) * २४९५० श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सौर ऊर्जेचा लाभ २० तासांवरून केवळ ८ तासांवर आणल्यामुळे ग्राहकांच्या वीज देयकात अवास्तव वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून वीज दर वाढवून राज्यातील ग्राहकांकडून सुमारे ११,७०० कोटी रुपयांची अतिरिक्त वसुली करण्यात येणार असल्याने राज्यातील उद्योग, व्यापारी संस्था आणि सामान्य नागरिकांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे औद्योगिक वीज दर वाढल्यामुळे राज्यातील उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत झाल्याने राज्यातील महसूलात घट होऊन राज्यातील बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सौर ऊर्जेचा लाभ कमी करण्याच्या आणि प्रस्तावित वीज दरवाढीसंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने ग्राहकांना वाढीव वीज देयकांपासून दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम २००३ नुसार, मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला राज्यातील ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचा अधिकार आहे. हरित ऊर्जा स्वस्त दरात व दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने मा.आयोगाने सौर ऊर्जा उपलब्धता तासांत सवलत देण्यासाठी वीज पुरवठा वेळापत्रकाची (Time of Day-ToD) पुर्नरचना केली. सदर TOD वीजदराची पुर्नरचना, ही ऊर्जा मंत्रालयाने (MOP) अधिसूचित केलेल्या वीज (ग्राहकांचे अधिकार) सुधारणा नियम, २०२३ च्या नियम ८अ अनुसार आहे. त्यानुसार सौर तासांतील वीज वापराचा लाभ आणि इतर बाबी लक्षात घेवून मा.आयोगाने दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरिता २% (आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी) ते ९% (आर्थिक वर्ष २०२९-३० साठी) सरासरी वीजदर कपात मंजूर केली आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीद्वारे मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला सादर केलेल्या अतिरिक्त प्रस्तावामध्ये, एकूण रु.११,७५१ कोटींचा अतिरिक्त आर्थिक खर्च समाविष्ट केला आहे. सदरचा अतिरिक्त भार हा मा.सर्वोच्च न्यायालय, विद्युत अपिलीय न्यायाधिकरण (APTEL), केंद्रीय वीज नियामक आयोग (CERC) आणि मा. वीज नियामक आयोग (MERC) यांनी दिलेल्या नव्या आदेशांमुळे निर्माण झाला आहे. सदरचे सर्व निर्णय, बहुवर्षीय वीजदर (MYT) आदेशानंतर आले असल्यामुळे, हे खर्च आधीच्या एकूण महसूली गरजेमध्ये (ARR) समाविष्ट

करणे शक्य झाले नाही. सदर अतिरिक्त खर्चाच्या प्रस्तावावर नियामक प्रक्रियेचा अवलंब करून मा. वीज नियामक आयोगाकडून निर्णय घेण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

महावितरणने नवीकरणीय ऊर्जेवर (सौर, पवन, पंप स्टोरेज, बॅटरी स्टोरेज) भर दिला असून, या स्रोतांमधून हरित वीज स्वस्त दरात मिळणार असल्याने त्याचा लाभ महावितरणाच्या इतिहासात प्रथमच औद्योगिक ग्राहकांना सुध्दा वीजदर कपातीच्या स्वरूपात करून देण्यात आला आहे. या कारणास्तव महावितरणच्या इतिहासात प्रथमच महावितरणने ग्राहकांकरिता वीजदर कपातीविषयी प्रस्ताव दाखल केला व त्यानुसार मा.वीज नियामक आयोगाच्या दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील सर्व वीज ग्राहकांचे वीजदर कमी झाले आहेत.

तसेच, महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांसाठी मोठ्या प्रमाणात देण्यात आलेल्या विविध सवलतीसह टाइम ऑफ डे नुसार दिवसा केलेल्या वीज वापरावर (Solar hours) लागू वीज आकाराच्या सरासरी २०%-२५% सवलत (आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३०) तसेच विद्युत अधिनियम,२००३ कलम ६५ अन्वये शासन अनुदान उपलब्ध आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिकरोड (जि.नाशिक) मध्यवर्ती कारागृहातील कैदी ड्रग्ज घेत असल्याबाबत**

**(६) * ३०९८४ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकरोड (जि.नाशिक) मध्यवर्ती कारागृहात कैदी ड्रग्ज घेतानाचे छायाचित्र, चित्रफित व रिल्स व्हायरल झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारागृहात मोबाईल ठेवण्यास कैद्यांना प्रतिबंध असतानाही त्यांच्याकडे मोबाईल मिळाल्याप्रकरणी नाशिक पोलिस ठाण्यात यापूर्वी देखील अनेकदा गुन्हे दाखल केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध कारवाई करण्यासह अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) खरे आहे.

(३) व (४) I. याप्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाणे येथे दिनांक १७/१०/२०२५ रोजी ०७ आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३च्या कलम २२३ अनुसार गु.र.क्र. ५२७/२०२५ दाखल करण्यात आला आहे.

II. गुन्ह्याच्या तपासाअंती मा.न्यायालयात दिनांक १६/१२/२०२५ रोजी दोषारोपपत्र क्रमांक २००/२०२५ दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

III. तसेच, या प्रकरणात अधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी सुरु आहे.

IV. बंद्यांना नियमानुसार प्राप्त ॲलन फोन (स्मार्ट फोन) सुविधा आठवड्यातून ३ वेळा ३० मिनिटांकरिता दिल्या जात असल्याने अवैध मोबाईल वापरावर प्रतिबंध झाला आहे.

V. नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी CCTV, MOBILE DETECTOR, WALKIE-TALKIE, MOBILE JAMMER, यांसारखे अत्याधुनिक सुरक्षा उपकरणे वापरण्यात येतात. तसेच, अवैध मोबाईल वापरावर प्रतिबंध करण्याकरिता दक्षता पथकांमार्फत विशेष झडत्या नियमितपणे राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्यात अवैध गौण खनिज साठा सापडल्याबाबत**

**(७) * २५११३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा, कन्हान, उमरेड (चांदुरी घाट) व कळमना येथील संलग्न भागात अवैधरित्या रेतीची चोरी करुन रुपये ३ लाख २० हजार किंमतीची ४० ब्रास रेती साठविल्याप्रकरणी कळमना पोलीसांनी दोन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून बनावट रॉयल्टी पावत्या आणि बनावट "ई-टीपी" (इलेक्ट्रॉनिक ट्रान्झिस्ट पास) वापरुन रेतीची छुप्या मार्गाने विक्री केल्याने शासनाचा सुमारे १०० कोटीहून अधिक रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत मौजा कळमना येथे अवैध गौण खनिज साठा असल्याची गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने सदर गोपनिय माहितीच्या आधारे ४० ब्रास रेती किंमत रु.३,२०,०००/- घटनास्थळी जप्त केली. सदर प्रकरणी दोन व्यक्तींविरूध्द कळमना पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे अप. क्र. २५/२०२६, कलम ३०३ (२), भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अधिकच्या तपासात सदर जप्त रेती "बेले ट्रेडर्स ॲण्ड पेवर्स" चे मालक यांची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) महसूल विभागाकडून प्राप्त माहितीनुसार रेतीची छुप्या मार्गाने विक्री करुन शासनाचा महसूल बुडविल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) कळमना येथे जप्त रेती बाबत अधिक चौकशी केली असता "बेले ट्रेडर्स ॲण्ड पेवर्स" चे मालक श्री.अभिषेक ईश्वर बेले यांचा गट्टू तयार करण्याचा व्यवसाय असून त्यांनी ५८ ब्रास रेतीसाठा रेती गट्टू बनविण्याकरिता व पूर्ण जागेला वॉलकंपाऊंड बनविण्याकरिता यादव कंन्स्ट्रकशन कडून विकत घेतल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी गौण खनिज वाहतूक परवाना (ROYALTY TP) सादर केला आहे. श्री.बेले यांनी सादर केलेल्या पावत्या (ROYALTY TP) या तपासणीअंती वैध असल्याचे दिसून आले. सदर रेती श्री.बेले यांनी स्वत:च्या वापराकरिता घेतलेली असून सदर गौणखनिज (रेती) वैधरित्या घेतलेली असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे सदर रेतीवर अवैध गौणखनिज बाबतची कार्यवाही करता येणार नसल्याबाबत पोलीस विभागास तहसिलदार, नागपूर शहर यांनी दिनांक १६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ईश्वरपूर (जि. सांगली) येथे अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन सामुहीक बलात्कार केल्याबाबत

**(८) * २८३९१ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईश्वरपूर (जि.सांगली) येथे अल्पवयीन मुलीचे दोन सराईत गुन्हेगारांनी तिचे अपहरण करुन ऊसाच्या शेतात सामुहीक बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडल्यानंतर आरोपी पळून गेल्यानंतर रात्रीच्या अंधारातून मुलगी १ कि.मी. पायी चालत घरी आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध कारवाई करण्यासह असहाय्य मुलींवरील अत्याचाराच्या घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) ईश्वरपूर (जि.सांगली) येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना घडली असून, सदर प्रकरणी ईश्वरपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४८०/२०२५ नुसार दिनांक १७.१२.२०२५ रोजी कलम ६४(१), ७०, १३७(२), ११५(२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४,५(ग),६ पोक्सो कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना दिनांक १७.१२.२०२५ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक २२.१२.२०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सद्य:स्थितीत दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून दिनांक २९.०१.२०२६ रोजी दोन्ही आरोपींविरूद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

राज्यातील महिला व मुलींच्या अत्याचाराच्या घटना घडू नयेत म्हणून शासनामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे :-

१) महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यानुषंगाने इतर अनुषंगिक कारवाई करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग हा स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे.

२) सर्व पोलीस घटकांमध्ये पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली महिलांविषयीच्या गुन्हयांचा तपास करण्यासाठी स्वतंत्र पोलीस तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

३) महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये एकूण ५१ भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

४) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणा-या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय / पोलीस अधीक्षक व पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

५) महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहे.

६) राज्यात ३७ पोक्सो व २० जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.

७) महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना २४ x ७ मदत देण्यात येते.

८) राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया व दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

९) अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

१०) महिलांबाबत योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती" स्थापन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील सिंहगड किल्ल्याची झालेली दुरवस्था

**(९) * २३६८९ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड किल्लाची (जि.पुणे) अत्यंत दुरवस्था झाली असून सिंहगड किल्ला विकास आराखडा अंतिम मान्यतेस प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगड किल्ल्यावर सुरु असलेले बांधकाम व देखभाल कामांदरम्यान वापरले जाणारे चुना, गूळ इत्यादी साहित्य अनेक दिवस बॅरलमध्ये उघडे ठेवण्यात आल्यामुळे पावसाचे पाणी साचून दुर्गंधी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.नरवीर तानाजी मालुसरे स्मारक अपूर्णावस्थेत असून, पुरातत्त्व विभाग आणि सांस्कृतिक वारसा विभागाने संबंधित कामांवर पुरेशी देखरेख न ठेवल्याचे निदर्शनास आले असून सदर कामांची सद्य:स्थिती काय आहे व उक्त काम पूर्ण करण्यासाठी काही कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या कडेला लावण्यात आलेले सुरक्षात्मक कठडे अनेक ठिकाणी पडले असल्यामुळे पर्यटकांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय करून दुरुस्तीची कामे तातडीने करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सिंहगड किल्ल्याच्या परिसरात निर्माण झालेल्या अस्वच्छतेमुळे पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचा पर्यावरण विभागामार्फत तपासणी अहवाल मागविला आहे काय, तसेच स्वच्छतेसाठी व संरक्षणासाठी विशेष निधी, स्वतंत्र स्वच्छता युनिट किंवा पुरातत्त्व विभागाची संयुक्त जबाबदारी निश्चित करण्याकरिता कार्यवाही करण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे.

"समग्र सिंहगड किल्ला व परिसर विकास" याकरीता रू.२८५.९९ कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रस्ताव शिखर समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही नियोजन विभागाकडून करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सिंहगड किल्ल्यावरील जतन-संवर्धनाचे काम हे पुरातत्वशास्त्र संकेतानुसार करण्यात येत आहे. यामध्ये सदरचे बांधकाम हे चुना मिश्रणामध्ये करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिका मार्फत सिंहगड किल्ल्यावर श्री नरवीर तानाजी मालुसरे समाधीचे काम पूर्ण झाले असून, सदर स्मारकाचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये लोकार्पण करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत स्मारकाबाहेरील परिसराचे सुशोभिकरण व पर्यटकांना सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम माहे मार्च, २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल असे पुणे महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.

(४) सिंहगड किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या कडेला सुरक्षात्मक कठडे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उभारण्यात आले असून, त्यांचे संगोपन (मेंटेनन्स) करणे ही कामे या विभागामार्फतच केली जातात. तसेच, घाट-रस्त्याच्या कडेला गॅबियन भिंत उभारण्याचे काम वन विभागामार्फत करण्यात आले आहे.

(५) सिंहगड किल्ल्यावर स्वच्छतेबाबत सुयोग्य व्यवस्थापन व्हावे याकरीता वन विभागाकडून "संयुक्त वन व्यवस्थापन समिती" स्थापन करण्यात आली आहे. सदर समिती पर्यटकांकडून उपद्रव शुल्क आकारते व या निधीमधून स्वच्छतेबाबतची कामे करण्यात येतात. सद्य:स्थितीत या समितीकडून किल्ले परिसरात नियमित स्वच्छता होण्यासाठी ३५ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच, किल्ल्याची देखभाल व परिरक्षण करण्यासाठी पुरातत्व विभागाकडून सामाजिक संस्था दायित्व (CSR) अंतर्गत ७ पहारेकरी/स्वच्छता कर्मचारी व १ नियमित पहारेकरी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने राष्ट्रीय जनगणनेसाठी जाहिर केलेल्या नियमावलीत इतर मागासवर्गीय समाजासाठी स्वतंत्र रकाना देण्यात आला नसल्याबाबत

**(१०) * २९४१७ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने राष्ट्रीय जनगणनेसाठी जाहिर केलेल्या ३३ कलमी नियमावलीत इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र रकाना (कॉलम) देण्यात आला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने आगामी जनगणनेत इतर मागासवर्गीय समाजाची स्वतंत्र जनगणना करण्याची घोषणा करून त्याचा दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजीच्या प्रसिध्द झालेल्या राजपत्रात उल्लेख आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल, २०२६ पासून जनगणनेचा पहिला टप्पा सुरु होणार असून त्यापूर्वी राज्य शासन आपली भूमिका केंद्र शासनाकडे मांडणार आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाने भारताची जनगणना-२०२७ दोन टप्प्यात करण्याचे निश्चित केले आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणनेचे काम करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी प्रश्नावली केंद्र शासनाने दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी प्रसिध्द केली आहे. या टप्प्यात प्रत्येक घराची स्थिती, घरात उपलब्ध सुविधा आणि मालमत्तेचे मालकी हक्क इ. बाबत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाद्वारे सद्य:स्थितीत केवळ पहिल्या टप्प्यासाठी कालावधी व प्रश्नावली याबाबत अधिसूचना जारी करण्यात आल्या आहेत. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रश्नावली ज्यामध्ये जात विषयक प्रश्नांचा समावेश असेल, ती केंद्र शासनाद्वारे अद्याप अधिसूचित करण्यात आली नसून, ती कालांतराने योग्य वेळी प्रसिद्ध केली जाईल. केंद्र शासनाद्वारे दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले आहे की, व्यक्तीची जात जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात नोंदवली जाईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबईत ऑनलाइन रिअल इस्टेट वेबसाइट्सद्वारे नागरिकांची फसवणूक झाल्याबाबत

**(११) * २७६३६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शहरांसह विशेषत: ऑनलाइन रिअल इस्टेट वेबसाइट्सवर स्वस्त फ्लॅट मिळवून देतो असे सांगून नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मालाड (पूर्व) येथील ३१ वर्षीय रहिवाशांची रूपये ३० लाख इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच "हाऊसिंग डॉट कॉम" या संकेतस्थळावर खोटी घरविक्रीची जाहीरात देऊन रूपये २६ लाख इतक्या रकमेची फसवणूक करण्यात आल्याने श्री. नवल राजपुत यांच्या तक्रारीवरुन मुंबईतील मालाड पोलीसांनी या संदर्भात गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा फसवणुकीला प्रतिबंध घालण्यासाठी धोरणात्मक, कायदेशीर किंवा नियामक पावले उचलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फिर्यादी, वय-६८, रा. चर्चगेट, मुंबई हे शेअर मार्केट मध्ये गुंतवणूकीबाबत गुगलवर शोध घेत होते. त्यावेळी एका व्यक्तीने स्टॉक मार्केट मध्ये गुतंवणूक करण्याबाबत TRADER TITAN VIP ५६ Admin या ग्रुप मध्ये जॉईन होण्याकरीता फिर्यादी यांच्या व्हॉट्सॲप नंबर वर एक लिंक पाठविली.

तसेच त्यांना शेअर मार्केट मध्ये मोठ्या नफ्याचे आमिष दाखवून "warburgpincin" या बनावट शेअर ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास सांगितले.

तद्नंतर फिर्यादी यांना विविध बँक खात्यांमध्ये एकूण रु.१०,९८,६५,०००/- इतकी रक्कम भरण्यास भाग पाडून त्यांची आर्थिक फसवणूक केली. त्यानुषंगाने दक्षिण विभाग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. क्र.०६/२०२६ भारतीय न्याय संहिता चे कलम ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ६१ (२), सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (क), ६६ (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ०९ आरोपींना अटक करण्यात आली असून अटक केलेले आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी रू.२,३६,७६,७८१/- इतकी रक्कम होल्ड करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(२) दिनांक २७.०७.२०२५ ते दि.०१.०८.२०२५ या कालावधीत टेलिग्राम चॅनलवरील विविध अनोळखी व्हॅट्सॲप मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना व्हिडिओ लाईक करण्याचा टास्क दिला.

सदर टास्क पूर्ण केल्यावर नफा मिळविण्याचे आमिष दाखवून फिर्यादी यांना विविध टेलिग्राम ग्रुप जॉईन करण्यास सांगितले.

तद्नंतर फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून विविध टास्कच्या गुंतवणूकीसाठी आयएमपीएस, युपीआय आयडीद्वारे विविध बँक खात्यात एकूण रु.११,४२,४९९/- इतकी रक्कम ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. व्हिडिओ लाईक टास्क पूर्ण केल्यानंतर विविध तारखांना रू.१०,९१०/- इतकी रक्कम कमिशन म्हणून फिर्यादी यांच्या बँक खात्यात पाठविली. तसेच, फिर्यादी यांनी गुंतवणूक केलेल्या खात्यावर रू.१२,६८,८००/- इतका आभासी नफा दर्शविण्यात येत होता. तथापि, सदर गुतंवणूक केलेली रक्कम आभासी नफ्यासह परत न केल्याने सदर फसवणुकीत सहभागी असलेले व्हॉट्सॲप मोबाईल धारक, टेलिग्राम आयडी धारक तसेच फसवणुकीची रक्कम जमा झालेल्या बॅंक खातेधारकांविरूध्द पुर्व विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.०४.०८.२०२५ रोजी गु.र.क्र. १७१/२०२५, भारतीय न्याय संहिताचे कलम ३१८(४), ६१(२), ३(५) सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) व (४) राज्यात सन २०२५ मध्ये इन्व्हेस्टमेंट स्कॅम संबंधित आर्थिक फसवणुकीबाबत एकूण २१६३ सायबर गुन्ह्यांची नोंद असून ४५५ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी / एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील विकासकाने सदनिकाधारकांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१२) * २९६८० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील शासनाच्या भूखंडावर ५ भागीदार विकासक असलेल्या मे.अमृत कंपनीने श्री अमृत पार्क सोसायटीमधील ११२ सदनिकाधारकांची सुमारे ४४ कोटी रुपयांची अर्थिक फसवणूक केल्यामुळे स्थानिक नागरिकांनी कळवा पोलीस ठाण्यात दिनांक ४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आल्यानंतर सदर प्रकरणाचा तपास ठाणे गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न करता, प्रकरण दडपून टाकण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह विकासकाकडून सदनिका जप्त करुन गैरव्यवहाराच्या रकमेची तात्काळ वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अमृत पार्क को.ऑ.हौ. सोसायटीज असोसिएशन लि. अंतर्गत येणाऱ्या १) अमृत पार्क को.ऑ. हौ. सो. लि. २) श्री.अमृत पार्क को.ऑ. हौ. सो. लि. ३) ओम अमृत पार्क को.ऑ. हौ.सो.लि. या तिन्ही इमारती अनधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या सर्व्हे क्र.१७, भूमापन क्र.३४५१ जागेवर बांधल्या तसेच सदर जागा ही सर्व्हे क्र.१२, मौजे कळवा, ता.जि.ठाणे ची असल्याचे भासविण्यासाठी त्या जागेची बनावट कागदपत्रे तयार करून ती कागदपत्रे खरी आहेत असे भासवून श्री.दिपक रमेश मेहता व इतर ०४ भागीदार विकासक आरोपींनी ११२ सदनिकाधारकांची दिशाभूल केली. बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणीकृत केले व सदनिकांची ११२ सदनिकाधारकांना विक्री केली व त्याद्वारे या सदनिकाधारकांची सुमारे ४४ कोटी रुपये इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक केली. या घटनेबाबत कळवा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दिनांक २९.०९.२०२५ रोजी गु. र. क्र.७७०/२०२५, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. तपासाअंती श्री.दिपक रमेश मेहता व इतर ०३ आरोपी यांच्या विरोधात मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे येथे दिनांक २७/१२/२०२५ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. तसेच सदर जमिनीचे मूळ मालक श्री.शंकर नाम म्हात्रे (मयत) यांच्या विरोधात ॲबेटेड समरी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे येथे सादर करण्यात आलेली आहे.
(३) सदर ०३ इमारतींमधील सदनिका या सध्या फिर्यादी व इतर ११२ सदनिकाधारकांच्या ताब्यात आहेत. शहर विकास विभाग, ठाणे तसेच नगर भूमापन, ठाणे यांचेकडून अमृत पार्क सी.एच.एस.असो.लि. अंतर्गत येणाऱ्या ३ इमारतीची स्थळ पाहणी करून त्याचा अहवाल प्राप्त करण्यात आला आहे. सदर इमारती कोणत्या भुमापन क्रमांकावर उभ्या आहेत याबाबत नगर भूमापन विभागाने पाहणी केली असून प्रत्यक्ष मोजणी केल्यानंतर पुढील

कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे. नमूद गुन्हयातील सर्व्हे क्र.१२, सर्व्हे क्र. १७, मौजे कळवा या जमिनीचा सातबारा, फेरफार, मालमत्ता पत्रक प्राप्त करण्यात आले आहेत. ग्राम महसुल अधिकारी, कळवा यांचा नमूद गुन्हयाच्या अनुषगांने जबाब नोंदविण्यात आला आहे. तसेच नगर भूमापन विभागाच्या चौकशी नोंदवहीच्या उताऱ्याची प्रत प्राप्त करण्यात आली आहे. मूळ सदनिकाधारकांच्या नावाची यादी व त्यांचे इंडेक्स २ ची साक्षांकित प्रत प्राप्त केली आहे. नमूद सर्व्हे क्र.१२, सर्व्हे क्र. १७ याचे तपशीलवार कागदपत्र प्राप्त झाले आहे. नगर भूमापन विभाग व शहर विकास विभाग या अधिकाऱ्यांचे गुन्हयाच्या अनुषंगाने तपशीलवार जबाब नोंदविण्यात आले आहे. आरोपी श्री.दिपक रमेश मेहता याचे पासपोर्टचे तपशिल प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर गुन्हयाचा तपास फौ. प्र. सं. १७३ (८) प्रमाणे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) येथील हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या शाळेतील विद्यार्थिनींवर शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(१३) * ३१६३० श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) शहरातील हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या नवीन मराठी प्राथमिक शाळेतील शिक्षक श्री.सचिन गोणारकर याने इयत्ता दुसरी शिकणाऱ्या वय ८ वर्षे असणाऱ्या ४ विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केला असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या दुसऱ्या शाळेतील एका शिक्षकाच्या घरी माजी विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घडलेल्या प्रकाराची चर्चा करू नये यासाठी हिंद सेवा मंडळ या संस्थेने अत्याचारग्रस्त विद्यार्थिनींच्या पालकांवर दबाव टाकल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने उक्त गंभीर प्रकरणांतील आरोपी व आरोपीची गैरकृत्ये दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या व उक्त प्रकरणास जबाबदार असलेल्या हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) शहरातील हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत शिक्षकाने इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं १०१/२०२६ नुसार दि.११.०२.२०२६ रोजी कलम ६४(२) (एफ), ६५(२), ७४ भा. न्या. सं. सह कलम ४ (२), ६, ८, १०, १२ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीला दिनांक ११.०२.२०२६ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक १८.०२.२०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(२) सदर संस्थेच्या अन्य शाळेतील एका शिक्षकाच्या घरी माजी विद्यार्थिनीने दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ रोजी आत्महत्या केल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५२/२०२६ नुसार दिनांक २८.०२.२०२६

रोजी कलम ३(५), १०८ भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पाच आरोपी निष्पन्न झाले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) व (४) श्रीरामपूर शहरातील हिंद सेवा मंडळ या संस्थेच्या दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने आरोपी शिक्षकाची शिक्षण सेवक पदावरील नियुक्ती गुन्हा नोंद झाल्याच्या दिवशीच रद्द केली आहे. तसेच, सदर संस्थेच्या अन्य शाळेतील एका शिक्षकाच्या घरी माजी विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याच्या घटनेच्या अनुषंगाने आरोपी शिक्षकास सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

तसेच, हिंद सेवा मंडळ या संस्थेमार्फत पीडित विद्यार्थिनींच्या पालकांवर दबाव टाकल्याचे व आरोपींचे गैरकृत्ये दडपण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उलवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अंमली पदार्थांच्या तस्करी करणाऱ्या आरोपीने पोलिसांच्या पथकावर हल्ला केल्याबाबत

**(१४) * ३०१७५ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उलवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अंमली पदार्थाच्या तस्करीत सहभागी असलेल्या आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकावर तलवार आणि चॉपर या शस्त्रांचा वापर करुन जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हल्ल्यात पोलिस निरीक्षकासह ४ जण गंभीर जखमी झाले असून, उक्त गुन्ह्यातील आरोपी फरार झाले असल्याने त्यांच्या शोधासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह राज्यात पोलीसांवरील हल्ले रोखणे, कायदा व सुव्यवस्था कठोर व सक्षम करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मानखुर्द पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे एन.डी.पी.एस अधिनियम १९८५ कलम ८(क), २२, २९ अन्वये दाखल गुन्हा रजि. नं. २३/२०२६ मधील आरोपींचा शोध घेण्यासाठी दिनांक ३१.०१.२०२६ रोजी पोलीस पथक उलवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई हद्दीत गेले होते. सदर पथकास शगुन चौक, उलवे येथे उलवा पोलीस ठाण्याचा पत्ता विचारत असताना पथकासोबत असलेल्या पोलीस मित्राने उपरोक्त गुन्ह्यातील आरोपी हे तेथून मोटारसायकलवरून जात असल्याची माहिती दिल्याने सदर पोलीस पथकाने आरोपींना पकडण्यासाठी सापळा लावला.

तथापि, सापळ्याची माहिती आरोपींना मिळाल्याने त्यांनी आपसात संगनमत करून बेकायदेशीर जमाव जमवून हातामध्ये अवैध शस्त्रे घेऊन तपासासाठी आलेल्या पोलीस पथकाच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच आरोपींनी पोलीस पथकावर हल्ला करून पोलीस मित्र व सहायक पोलीस निरीक्षक यांना जखमी केले.

सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध उलवा पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(१), १०९, ३०९(६), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५२, ३५१(३), २२३ सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३/२५, ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(अ), १३५ अन्वये दिनांक ०१/०२/२०२६ रोजी गुन्हा रजि. नं. ४२/२०२६ नोंदविण्यात आला.

(२) सदर प्रकरणात १ सहायक पोलीस निरीक्षक व ३ पोलीस मित्र असे एकणू ४ जण किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच, सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यात एकूण ०८ आरोपींना अटक करण्यात आली आहे तर पाहिजे आरोपींचा शोध घेणे चालु आहे. गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक नेमण्यात आले आहे.

(३) पोलीसांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

१. पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सुरक्षेसाठी बुलेटप्रूफ जॅकेट, हेल्मेट, शिल्ड इत्यादी आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात येतात.

२. पोलीसांना त्यांच्या मूलभूत प्रशिक्षणादरम्यान स्वसंरक्षणाचे तर मोठ्या जमावावर नियंत्रण ठेवण्यासाठी (Crowd Control) पोलीस अधिकारी व अंमलदारांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते.

३. स्थानिक नागरिकांशी संवाद व समन्वय वाढविण्यासाठी पोलीस मित्र, मोहल्ला कमिटी इत्यादी माध्यमांद्वारे नियमित संपर्क ठेवण्यात येतो.

तसेच, गुन्हेगारी नियंत्रण व कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :-

१. राज्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणेमार्फत नियमित गस्त, नाकाबंदी, कॉम्बिंग ऑपरेशन व संवेदनशील ठिकाणी विशेष बंदोबस्त ठेवण्यात येतो. तसेच सराईत व संशयित गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांच्यावर सातत्याने देखरेख ठेवण्यात येते.

२. संघटित व गंभीर गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार मोक्का, तडीपारी, प्रतिबंधात्मक अटक, स्थानबद्धता यांसारख्या कायदेशीर तरतुदींन्वये कारवाई करण्यात येते.

३. आर्थिक व सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी राज्यात Financial Intelligence Unit (FIU) च्या ४९ युनिट्स स्थापन करण्यात आल्या असून या युनिट्समार्फत संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे, तपास करणे तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करून आर्थिक गुन्हे रोखण्याचे कार्य करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील अदानी पॉवर कंपनीतून होणाऱ्या बेकायदा राख साठवणूक व प्रदूषणाबाबत

**(१५) * ३०६७० श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील अदानी पॉवर कंपनीतून मोठ्या प्रमाणात ट्रक द्वारे वाहतूक केली जात असून जास्त लोड झालेल्या ट्रक चालकांकडून ही राख रस्त्याच्या कडेला कुठेही खाली करण्याचे प्रकार होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राख हवेत उडाल्याने डोळ्यांना जळजळ, श्वास घेण्यास अडचणी तसेच रस्त्यावर दृश्यमानता धूसर होऊन अपघाताचा धोका निर्माण झाला असल्याने नागरिक आणि वाहनधारकांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त राखेचा बेकायदा साठा हा पर्यावरणीय नियमाचे सरळ उल्लंघन ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार त्यांचे कार्यालयास तक्रार प्राप्त नाही.

(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२३ पासून उत्पादन प्रक्रियामधून निघणारी राख (Bottom Ash) कंपनी बाहेर पाठविण्यात येत नसून संमतीपत्रातील अटी व शर्तीनुसार ॲश पाँड (Ash Pond) मध्ये साठविली जाते. तसेच, फ्लाय ॲश (Fly Ash) संपूर्णपणे बंद वाहन "बल्कर" (Bulker) मधून वाहतूक करून आर.एम.सी. प्लांटमध्ये वापरासाठी पाठविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागात स्मार्ट स्टिकच्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) * ३११२२ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागात दिव्यांगांसाठी शासन निधीतून खरेदी करण्यात आलेल्या स्मार्ट स्टिक आणि साध्या स्टिक साठी बाजारभावाच्या किमतीपेक्षा पाच पटीने अधिक किंमत अदा करण्यात आल्याचे चौकशी समितीच्या अंतिम अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग कल्याण विभागात सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या आर्थिक वर्षात स्मार्ट स्टिक तब्बल रुपये १२ हजार आणि साधी स्टिक तब्बल रूपये ८ हजार इतक्या किंमतीला विकत घेतल्याचे सदर अहवालात निदर्शनास आले असून लाखो रुपयांच्या निधीचा अपव्यय झाला असतांना तत्कालीन विभाग प्रमुख व उपायुक्त यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तत्कालीन विभाग प्रमुखांनी खरेदी प्रक्रियेपूर्वी आवश्यक शहानिशा, बाजार भाव तुलना किंवा पात्र पुरवठादारांचा शोध घेतला नसल्याने सदर दोषी अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याप्रकरणी, उल्हासनगर महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेने दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त आयुक्त-२ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली.

समितीने त्यांचा अंतिम अहवाल दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी सादर केला असून समितीच्या निष्कर्षानुसार खरेदी प्रक्रियेत त्रुटी असल्याचे दिसून येते. त्यानुसार चौकशी समितीने उल्हासनगर महानगरपालिकेचे तत्कालीन विभागप्रमुख व उपायुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांचेवर जबाबदारी निश्चित केली आहे. यासंदर्भात पुढील कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील "हाफ वे होम" मधील मनोरुग्णांच्या उपचाराकरिता देण्यात येणारे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ३०९६६ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे, ठाणे, नागपूर आणि रत्नागिरी येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील मानसिक आजार मुक्त व्यक्तींचे पुनर्वसन "हाफ वे होम" च्या १६ केंद्रात दिव्यांग कल्याण विभागाच्या योजनेतून माहे जून, २०२३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफ वे होम केंद्रामध्ये दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना निवास, दैनंदिन कौशल्य, सामाजिक संवाद, औषधे, प्रशिक्षण व स्वावलंबी बनविण्याकरिता प्रति रुग्ण साडेपाच हजार ते साडेबारा हजार रुपये पर्यंत अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १६ हाफ वे होम केंद्रांमध्ये मानसिक व शारीरिक पुनर्वसनाची जबाबदारी असलेल्या १५०० महिला व पुरुष मनोरुग्णाना औषध उपचाराची गरज असतांना सदरहू केंद्राना दोन वर्षापासून औषधाकरिता अनुदान उपलब्ध करण्यात आले नसल्याने मनोरुग्णांना मानसिक आजारातून स्वावलंबी बनविण्याकरिता अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "हाफ वे होम" मधील १५०० मनोरुग्णांना वेळेवर औषध उपलब्ध होत नसल्याने त्यांना पुन्हा मानसिक आजार उद्भवण्याची भीती "हाफ वे होम" च्या केंद्र चालकांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार "हाफ वे होम" केंद्रामध्ये दाखल असलेल्या मनोरुग्णाच्या उपचार, प्रशिक्षण इत्यादी करिता देण्यात येणारे थकीत अनुदान तात्काळ वितरित करून दरमहा नियमित अनुदान उपलब्ध करुन देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी येथे राज्य शासनाकडून चालविण्यात येत असलेल्या शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या नजीकच्या ठिकाणी मनोरुग्णालयातील मानसिक आजार मुक्त व्यक्तींकरिता १६ पुनर्वसन गृहे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०२४ अन्वये नागपूर, पुणे व ठाणे येथे ३ तर दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ अन्वये ठाणे, नागपूर व पुणे येथे ०५ अशा एकूण ०८ पुनर्वसन गृहांची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

अपर मुख्य सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ व १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना पुढील उपचाराची गरज नाही किंवा ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्ती बेघर आहेत किंवा ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना त्यांचे कुटुंबीय स्विकारत नाहीत, अशा व्यक्तींकरीता Half way homes/ sheltered accommodation / support accommodation या स्वरुपाची पुनर्वसन गृहे स्थापन करण्यासाठी ६ संस्थांची तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात आली. सदर संस्थांना ठाणे- १५,०००/-, पुणे- शहरी १३,०००/-, ग्रामीण- १०,०००/- नागपूर- ५,५००/-, रत्नागिरी ५,०००/- असे प्रती व्यक्ती अनुदानाचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

स्वयंसेवी संस्थांमार्फत मानसिक आजारमुक्त व्यक्तींकरिता पुनर्वसन गृह योजनेंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निवड करण्यात आलेल्या संस्थांना प्रति व्यक्ती दरमहा रक्कम रु. १२,०००/- इतके सहायक अनुदान देण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) होय, हे अंशत: खरे आहे.

पुनर्वसन गृहांतील प्रवेशितांना उपचाराची आवश्यकता असल्यास लगतच्या प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत औषधोपचार करण्यात येतो. तसेच मनोरुग्णांचे औषधे हे प्रादेशिक मनोरुग्णालयातून देण्यात येतात.

शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०२३ अन्वये निवड करण्यात आलेल्या संस्थांना कर्मचारी मानधन, आहार, वैयक्तीक सुविधा, वैद्यकीय व वैयक्तीक स्वच्छता खर्च, मनोरंजनात्मक सुविधा, आकस्मिक खर्च, प्रति प्रवेशित फर्निचर, भांडी, पलंग, अंथरुण- पांघरुण, स्वयंपाकाची भांडी, इतर उपयुक्त साहित्य, अनुषंगिक सेवा तसेच इमारत भाडे इत्यादी बाबीकरिता पुनर्वसन गृहातील प्रति प्रवेशितास सदर सहाय्यक अनुदान देण्यात येते.

त्यास अनुसरुन आयुक्त, दिव्यांग कल्याण यांचे दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्राव्दारे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता सदर पुनर्वसन गृहांच्या दरडोई थकीत व अनुज्ञेय अनुदानासाठी रु.२,६१,६०,०३६/- (अक्षरी रुपये दोन कोटी एकसष्ठ लाख साठ हजार छत्तीस फक्त) इतके अनुदान कार्यरत असलेल्या ६ संस्थांना वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात कार्यरत ६ संस्थांकरीता रु. ३.४६ कोटी इतका निधी दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या शासन ज्ञापनाव्दारे वितरीत करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**साक्री (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील मुलींना विहिरीत ढकलून हत्या केल्याबाबत**

**(१८)** * **३१४५७ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील नववीत शिकणाऱ्या दोन अल्पवयीन शाळकरी मुलींना विहिरीत ढकलून त्यांची हत्या केल्याची घटना दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी भुसावळ तालुका पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना कठोर शिक्षा द्यावी या मागणीसाठी ग्रामस्थांनी घटनास्थळी ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) साक्री (ता. भुसावळ, जि. जळगाव) येथे दोन अल्पवयीन मुलींना विहिरीत ढकलून त्यांची हत्या केल्याच्या घटनेबाबत भुसावळ तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५/२०२६ नुसार दिनांक २७.०१.२०२६ रोजी कलम १०३ (१),१३७ (२), ७८, ३(५) भा.न्या.सं. सह कलम १२ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा द्यावी या मागणीसाठी दिनांक २७.०१.२०२६ रोजी ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले होते.

सदर प्रकरणी गुन्हयातील दोन्ही विधि संघर्षित बालक यांची ओळख पटवून त्यांना दिनांक २८/०१/२०२६ रोजी ताब्यात घेण्यात आले असून सद्य:स्थितीत ते बालनिरीक्षणगृह, जळगाव येथे आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तसेच देशातील नागरिकांची ग्लोबल डिजीटल क्लस्टर कॉईन (GDCC) या कंपनीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१९) * ३१३९२ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच देशातील विविध भागात ग्लोबल डिजीटल क्लस्टर कॉईन (GDCC) या कंपनीने ३८,००० नागरिकांची सुमारे १३०० कोटी रूपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यासह विविध जिल्ह्यात या कंपनीने पुणे (जि.पुणे) येथून खोट्या लिंक्स व वेबसाईटद्वारे फसवणूक केली असून त्यातील मुख्य आरोपी श्री. इरफान सय्यद व त्याचा साथीदार श्री. व्यंकटेश भोई हे फसवणूक करुन फरार झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्यासह त्यांची मालमत्ता जप्त करुन फसवणूक झालेल्या नागरिकांना त्यांचे पैसे परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) प्रस्तुत गुन्हयांतील आरोपी यांनी विविध वित्तीय संस्था स्थापन करुन, वेबसाईट तयार करुन ग्लोबल डिजिटल क्लस्टर कॉईनचे (GDCC) प्रमोटर /मार्केटींग करत असल्याचे सांगून सदर कॉईन मध्ये गुंतवणूक केल्यास दुप्पट परतावा मिळेल असे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे.

सदर प्रकरणी गुंतवुणकदारांची फसवणूक केल्यामुळे आरोपी वित्तीय संस्थांविरुध्द महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्र राज्यात इचलकरंजी पोलीस ठाणे, जिल्हा कोल्हापूर गु.र.क्र. ३०४/२०२३, जालना तालुका पोलीस ठाणे, जि. जालना गु.र.क्र. २८/२०२३, ठाणे नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.र.क्र. ९४९/२०२४, राबोडी पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.र. क्र.८२४/२०२४ व कराड शहर पोलीस ठाणे, सातारा गु.र.क्र. १३३१/२०२४ असे एकूण ५ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयांतील आरोपी/वित्तिय संस्थानी राज्यात दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये ३७१ गुंतवणूकदारांची रूपये ४९,९४,६९,०५७/- रक्कमेची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी जालना तालुका पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या गुन्हयातील आरोपी इरफान मोद्यीन सय्यद व व्यंकटेश दशरथ भोई यांना दिनांक ०३.०२.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. सदर आरोपींना मा.उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने जामिनावर सोडण्यात आले होते. सदर दोन्ही आरोपी कोल्हापूर येथील गुन्ह्यात सुद्धा आरोपी असून श्री. इरफान सय्यद परागंदा असून त्यास शोधण्यासाठी लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. तसेच आरोपी श्री. व्यंकटेश भोई यास जामीन मंजुर असल्याने तपासी अधिकारी यांचे समक्ष हजेरी देणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. तथापी सदर आरोपी दिनांक ०४.१२.२०२४ पासून हजर झाला नसल्याने त्याबाबत मा.न्यायालयामध्ये जामीन रद्द करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणातील कोल्हापूर येथील गुन्हयाच्या अनुंषगाने महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये संबंधित आरोपी/वित्तीय संस्थांच्या मालमत्ता जप्त करुन सक्षम प्राधिकारी नियुक्तीबाबतचे दोन परिपुर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एक प्रस्तावावर कार्यवाही पूर्ण होऊन दिनांक ११.०३.२०२६ रोजी मालमत्ता जप्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. तसेच उर्वरित एका

प्रस्तावावर मालमत्ता जप्तीचे आदेश निर्गमित करण्यासाठी प्रस्ताव विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दक्षिण मुंबईतील शेअर ट्रेडरची सायबर गुन्हेगारांनी कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(२०) * ३१२५१ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील एका ६८ वर्षीय शेअर ट्रेडरची सायबर गुन्हेगारांनी रूपये १० कोटी इतक्या रकमेची फसवणूक केली असून, या गुन्ह्यातील धागेदोरे पाच राज्यांपर्यंत पसरलेले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्रोळी येथील एका सुशिक्षित तरुणीची सोशल मीडियावर ‘रिव्ह्यू आणि टास्क’ देण्याच्या बहाण्याने सुमारे रूपये १५ लाख ३० हजार इतक्या रकमेची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात दररोज हजारो नागरिक अशा ‘इन्व्हेस्टमेंट स्कॅम’ आणि ‘टास्क फ्रॉड’ला बळी पडत असल्याने अशा गुन्हेगारांच्या टोळ्यांचा नायनाट करण्यासाठी राज्य सायबर सेलकडे अद्ययावत तंत्रज्ञान आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह पीडीत तरुणीला पैसे परत मिळण्याकरीता तसेच परराज्यातून (उदा. पंजाब, बिहार, ओडिशा) चालणाऱ्या या सायबर टोळ्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र शासन किंवा इतर राज्यांच्या पोलिसांशी समन्वय साधून सायबर गुन्हे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फिर्यादी, वय-६८, रा. चर्चगेट, मुंबई हे शेअर मार्केट मध्ये गुंतवणूकीबाबत गुगलवर शोध घेत होते. त्यावेळी एका व्यक्तीने स्टॉक मार्केट मध्ये गुतंवणूक करण्याबाबत TRADER TITAN VIP ५६ Admin या ग्रुप मध्ये जॉईन होण्याकरीता फिर्यादी यांच्या व्हॉट्सॲप नंबर वर एक लिंक पाठविली.

तसेच त्यांना शेअर मार्केट मध्ये मोठ्या नफ्याचे अमिष दाखवून “warburgpincin” या बनावट शेअर ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास सांगितले.

तद्नंतर फिर्यादी यांना विविध बँक खात्यांमध्ये एकूण रु.१०,९८,६५,०००/- इतकी रक्कम भरण्यास भाग पाडून त्यांची आर्थिक फसवणूक केली. त्यानुषंगाने दक्षिण विभाग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. क्र.०६/२०२६ भारतीय न्याय संहिता चे कलम ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ६१ (२), सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (क), ६६ (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यात ०९ आरोपींना अटक करण्यात आली असून अटक केलेले आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी रू.२,३६,७६,७८१/- इतकी रक्कम होल्ड करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(२) दिनांक २७.०७.२०२५ ते दि.०१.०८.२०२५ या कालावधीत टेलिग्राम चॅनलवरील विविध अनोळखी व्हॅट्सअॅप मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना व्हिडिओ लाईक करण्याचा टास्क दिला.

सदर टास्क पूर्ण केल्यावर नफा मिळविण्याचे आमिष दाखवून फिर्यादी यांना विविध टेलिग्राम ग्रुप जॉईन करण्यास सांगितले.

तद्नंतर फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून विविध टास्कच्या गुंतवणूकीसाठी आयएमपीएस, युपीआय आयडीद्वारे विविध बँक खात्यात एकूण रु.११,४२,४९९/- इतकी रक्कम ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. व्हिडिओ लाईक टास्क पूर्ण केल्यानंतर विविध तारखांना रू.१०,९१०/- इतकी रक्कम कमिशन म्हणून फिर्यादी यांच्या बँक खात्यात पाठविली. तसेच, फिर्यादी यांनी गुंतवणूक केलेल्या खात्यावर रू.१२,६८,८००/- इतका आभासी नफा दर्शविण्यात येत होता. तथापि, सदर गुतंवणूक केलेली रक्कम आभासी नफ्यासह परत न केल्याने सदर फसवणुकीत सहभागी असलेले व्हॉट्सअॅप मोबाईल धारक, टेलिग्राम आयडी धारक तसेच फसवणूकीची रक्कम जमा झालेल्या बॅंक खातेधारकांविरूध्द पूर्व विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.०४.०८.२०२५ रोजी गु.र.क्र. १७१/२०२५, भारतीय न्याय संहिताचे कलम ३१८(४), ६१(२), ३(५) सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) व (४) राज्यात सन २०२५ मध्ये इन्व्हेस्टमेंट स्कॅम संबंधित आर्थिक फसवणुकीबाबत एकूण २१६३ सायबर गुन्ह्यांची नोंद असून ४५५ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वीत केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि. पालघर) तालुक्यातील टायर कंपन्यांमुळे प्रदूषणात वाढ झाल्याबाबत**

**(२१)** * **३१४५१ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसारणे व वडवली (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीत टायर पायरोसिस कंपन्या अतिप्रदूषणकारी असल्याने ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्यांमध्ये सुरक्षेची व्यवस्था व कारखाना परवाना नसणे तसेच वन व बांधकाम विभागाची परवानगी नसून केवळ नियंत्रण मंडळाच्या ना-हरकत दाखल्यावरच हे कारखाने कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपन्यांमध्ये जुने टायर जाळून त्यापासून ऑइल व तारा काढून त्याची विक्री करुन कारखान्यातील सांडपाणी नाल्यात सोडले जात असल्याने मासे व जनावरे मृत्युमुखी पडले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंपनीने कामगारांची कोणत्याही प्रकारची सुरक्षा बघितली जात नसल्याने बॉयलरच्या स्फोटात कामगार वारंवार मृत्युमुखी पडत असून उसर, वडवली, दिनकर पाडा, बिलोशी, पालसाई, सापना, किरवली, नेहरोली, तोरणे, कोने, कोनसई व डाकीवली या गावांच्या हद्दीत टायर कंपन्या वसलेल्या असून या भागामध्ये ७४ कंपन्यांपैकी ५४ अति प्रदूषणकारी कंपन्यांची संयुक्त तपासणी करण्याचे शासनाकडून निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांच्या आरोग्यास हानीकारक असलेल्या संबंधित कारखान्यांवर व दोषींविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रदान करण्यात येणाऱ्या संमतीपत्रातील अटीप्रमाणे औदयोगिक सुरक्षा व संचलनालयाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असते.

सहसंचालक, औदयोगिक सुरक्षा व आरोग्य यांचेकडून प्राप्त अहवालानुसार टायर पायरोलेसिसच्या एकूण ४६ कारखाने नोंदणीकृत आहेत. तसेच एकूण ११ कारखान्यांची नवीन परवाना करीता अर्ज सादर केला असून, अद्याप आवश्यक सुरक्षेच्या तरतुदी पूर्ण झालेल्या नसल्याने परवाना मंजूर करण्यात आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटीप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर करणे बंधनकारक आहे. कोणत्याही उद्योगास सांडपाणी बाहेर सोडण्यास परवानगी नाही.

सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मासे मृत्यू झाल्याबाबत स्थानिक मच्छीमार सहकारी संस्था किंवा मच्छीमारांमार्फत कोणतीही तक्रार कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

जिल्हा उपआयुक्त, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय, पालघर विभाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कंपन्यामधून जुने टायर जाळून त्यापासून ऑइल व तारा काढून त्याची विक्री करुन कारखान्यातील सांडपाणी नाल्यात सोडले जात असल्याने जनावरे मृत झाल्याचे कोणतीही तक्रार अथवा माहिती त्यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(४) सहसंचालक औदयोगिक सुरक्षा व आरोग्य यांचेकडून प्राप्त अहवलानुसार सदर विभागाकडे टायर पायरोलेसिस च्या एकूण ४६ कारखाने नोंदणीकृत आहेत. तसेच एकूण ११ कारखान्यांची नविन परवाना करीता

अर्ज सादर केला असून, अद्याप आवश्यक सुरक्षेच्या तरतुदी पूर्ण झालेल्या नसल्याने परवाना मंजूर करण्यात आलेला नाही, असे कळविले आहे.
(५) सदर उदयोगांबाबत मंडळाने कारवाई केली असून टायर पायरोलेसिस उद्योगांबाबत एप्रिल, २०२५ मध्ये विशेष सर्व्हेक्षण करण्यात आले.

पाहणीदरम्यान तसेच वेळोवेळी आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने माहे जानेवारी, २०२५ ते जानेवारी, २०२६ मध्ये ०२ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ०६ उदयोगांना प्रस्तावित आदेश आणि ०२ उद्योगांना अंतरिम निर्देश, ४३ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश व बंद केलेल्या ३३ उद्योगांना पुन:श्च उत्पादन चालू करण्याचे आदेश SOP ची पुर्तता केलेनंतर दिलेले आहेत.
सद्य:परिस्थितीत १२ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले आहेत. उत्पादन बंदचे आदेश दिलेल्या उद्योगांची दिनांक २७/०२/२०२६ रोजी रात्री पुर्नपाहणी करुन शहानिशा केली असून, सदर १२ उद्योगांचे उत्पादन अद्याप बंद आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील “आरसीएफ” पोलीसांनी केलेल्या कारवाईत सोन्याचे दागिने व रोख रक्कम सापडल्याबाबत

**(२२) * ३१४६० श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील “आरसीएफ” पोलीसांनी बांगलादेशी नागरिकांविरोधातील केलेल्या कारवाई दरम्यान सुमारे २० लाखांची रोख रक्कम आणि १५ तोळयांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी एका सहाय्यक पोलीस निरिक्षकासह तीन पोलीस शिपाई आणि एका एजंटविरोधात गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०२/०१/२०२६ रोजी एटीएस पथक, आर.सी.एफ.पोलीस ठाणे येथील पोलीसांनी फिर्यादीच्या रहात्या घरी बांगलादेशींविरुध्द कारवाई करायची आहे असे सांगून फिर्यादीला घराबाहेर पाठवले व त्यांच्या समंतीशिवाय घरातील रु.२० ते २५ लाख रोख रक्कम व १५ तोळयांचे दागीने चोरून नेल्याची तक्रार फिर्यादीने दिलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी ५ आरोपींविरुध्द दिनांक २५.०१.२०२६ रोजी आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३५/२०२६ भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस)२०२३ चे कलम ३०५(अ), ३०८(२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

या प्रकरणी चार आरोपींना दिनांक १८/०२/२०२६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.